# डॉ. नरेंद्र दाभोलकर - भारतातील वैज्ञानिक दृष्टिकोनाचे पथदर्शक

**डॉ. विवेक मॉंटेरो - गीता महाशब्दे**
**ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क** (AIPSN)

आयसॉन धूमकेतूच्या निमित्ताने एक राष्ट्रीय विज्ञान मोहीम आखली जात होती. बंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एस्ट्रोफिजिक्समध्ये त्याची कार्यशाळा चालू होती. ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्कचे देशभरातले विज्ञानकर्मी तिथे एकत्र जमले होते. दिवस होता २० ऑगस्ट २०१३. डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या निर्घृण हत्येची धक्कादायक बातमी त्या विज्ञान संमेलनात येऊन थडकली. त्या दिवशी एकीकडे पुण्यात डॉ. दाभोलकरांचे पार्थिव अंतिम दर्शनासाठी ठेवलं होतं, 'आम्ही सारे दाभोलकर' चे नारे दिले जात होते, आणि दुसरीकडे बंगलोरच्या AIPSN च्या संमेलनात पुढील ठराव पारित केला जात होता -

'डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन त्यांचे कार्य आणि ध्येय पुढे नेण्याची आम्ही प्रतिज्ञा करीत आहोत. सर्व प्रकारच्या अंधश्रद्धांना, दिशाभूलीला आणि धर्मांध दहशतवादाला विरोध करणं आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणं हे कार्य आम्ही नेटाने आणि जोमाने पुढे नेऊ. आपल्या देशाच्या अनेक भागांमध्ये आज धर्मांध दहशतवादी कारवाया चालू आहेत. त्यामागे असलेल्या शक्तींना विरोध करण्याचा आम्ही निर्धार करीत आहोत. भारतीय राज्यघटनेतील वैज्ञानिक दृष्टिकोन, धर्मनिरपेक्षता, समानता आणि लोकशाही मूल्ये मजबूत करून आपल्या देशातील प्रत्येक शाळेपर्यंत, गावा-खेड्यापर्यंत नेण्यासाठी आम्ही कार्यरत राहू.

ज्यांनी गांधीजींचा खून केला ते गांधीजींची तत्वे आणि विचार थोपवू शकले नाहीत. त्याचप्रमाणे डॉ. दाभोलकरांच्या या भ्याड खुनाने त्यांची मूल्ये आणि विचार थांबवता येणार नाहीत. लोकविज्ञान चळवळीत कार्यरत असलेले आम्ही सर्वजण जास्त निग्रहाने आणि जोमाने विज्ञान आणि वैज्ञानिक विचारपद्धतीचा प्रसार करू. चळवळ जास्त व्यापक करून, जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचून आम्ही प्रतिगामी सांप्रदायिक शक्तींना हारवू आणि ही विचारांची लढाई जिंकू.'

त्यानंतर दोन वर्षांनी एप्रिल २०१५ मध्ये बंगलोरला AIPSN चं अधिवेशन होतं. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणं आणि त्याचं सार्वत्रिकीकरण करणं यातील फरकावर त्यात सखोल चर्चा झाली.

देशाच्या राज्यघटनेत वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्पष्ट उल्लेख असलेला कदाचित भारत हा एकमेव देश असावा. घटनेच्या कलम ५१ अ मध्ये भारतीय नागरिकांची कर्तव्यं दिलेली आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणं हे एक कर्तव्य म्हणून त्यात नोंदलेले आहे. या कलमासाठी न्यायालयात

जाण्याची तरतूद नसली तरीही कलम २१ अ ने गुणवत्तापूर्ण शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क म्हणून दिलेला आहे. त्यानुसार गुणवत्तापूर्ण विज्ञान शिक्षणाचं, म्हणजेच वैज्ञानिक दृष्टिकोनाचं सार्वत्रिकीकरण कायद्याने बंधनकारक झालेलं आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचं सार्वत्रिकीकरण हे आता केवळ नागरिकांचे कर्तव्य नाही, तर ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांचा म्हणजे जवळपास २० कोटी भारतीय नागरिकांचा तो मूलभूत अधिकार झालेला आहे. म्हणजे आता ते अनिवार्य आहे.

परंतु सार्वत्रिकीकरण खरंच शक्य आहे का? ते शक्य केल्याचा, प्रत्यक्षात आणल्याचा अनुभव आपल्याकडे आहे. देवी, पोलिओ यासारख्या भयानक रोगांचा आपण सार्वत्रिक लसीकरणाद्वारे संपूर्ण नायनाट केला आहे. अनेक देशांनी सार्वत्रिक साक्षरता साधलेली आहे. सर्व जातीधर्मातील जवळपास प्रत्येक मुलगा आणि मुलगी आज शाळेच्या पटापर्यंततरी पोहोचलेले आहेत. शाळेत प्रवेश घेणे सार्वत्रिक होण्याच्या टप्पात आले आहे. त्यामुळे वरील प्रश्नाचं उत्तर 'होय, सार्वत्रिकीकरण शक्य आहे!' असं आहे. परंतु, वैज्ञानिक दृष्टिकोनाचं सार्वत्रिकीकरण शक्य आहे का?

त्यासाठी घटनेतलं वैज्ञानिक दृष्टिकोनाचं कलम आणि शिक्षण हक्काचं कलम एकत्रितपणे पाहणं आवश्यक आहे. शिक्षण हक्क कायदा आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ हे शिक्षण हक्कासंबंधीचे कायदेशीर दस्तावेज आहेत. यानुसार 'प्रत्येक बालकाचं आठवीपर्यंतचं गुणवत्तापूर्ण शिक्षण पूर्ण होणं आणि मुलांना केवळ संधी नाही तर निष्पत्तीची समानता मिळणं' याची शासनावर कायदेशीर सक्ती आहे. शाळेत प्रवेश घेण्याच्या फार पुढची आणि दमदार अपेक्षा आहे ही. या उद्दिष्टापासून आपण अजून कोसो दूर आहोत. तरीही सध्याच्या शासनाने घड्याळाचे काटे उलटे फिरवलेले आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सार्वत्रिक निष्पत्तीची भाषा सोडून देऊन २०२० चं नवं शैक्षणिक धोरण केवळ प्रवेशाच्या संधीची भाषा बोलत आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोनाचं सार्वत्रिकीकरण राष्ट्रीय अजेंडावर आणण्यासाठी ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने मिळून डॉ. दाभोलकरांचा शहीददिन हा राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस म्हणून साजरा करण्यास सुरूवात केली. 'विचारा, का?'(Ask Why) हे या मोहीमेचं घोषवाक्य आहे. आता अनेक संस्था, संघटना, शाळा, राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस साजरा करतात. त्यांच्या जाळ्यांद्वारे बहुतांश राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचे हजारो कार्यक्रम शाळांमध्ये, संस्थांमध्ये, गावांमध्ये, वस्त्यांमध्ये होतात. लाखो लोक यात सहभागी होतात.

ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क हे भारतभरातील लोकविज्ञान संघटनांचे नेटवर्क आहे. भारतातील लोकविज्ञान चळवळीचा पाया घातलेली केरळ शास्त्र साहित्य परिषद, प्रत्येक

जिल्ह्यात कार्यकर्त्यांचं जाळं असलेल्या लाखोंची सदस्यसंख्या असलेल्या विज्ञान संघटना, अनेक राज्यांमध्ये असलेलं भारत ज्ञानविज्ञान समितीचं जाळं, काही नमुन्यादाखल नावं घ्यायची तर, पश्चिम बंगाल विग्यान मंच, तामिळनाडू सायन्स फोरम, आंध्रप्रदेश आणि तेलंगाणा मधील जनविग्यान वेदिका, कर्नाटक राज्य विज्ञान परिषद, महाराष्ट्रातील नवनिर्मिती गट, पॉंडिचेरी सायन्स फोरम, मध्यप्रदेश विग्यान सभा, छत्तिसगड विग्यान सभा, हिमाचलमधील ग्यानविग्यान समिती, बिहार, ओरिसा, राजस्थान, मणिपूर आणि नागालँडमधील भारत ज्ञानविज्ञान समुदाय, हरयाणा विग्यान मंच, दिल्ली सायन्स फोरम, त्रिपुरा विग्यान मंच, आसाम साहित्य सभा आणि एलोरा विग्यान मंच,... ही AIPSN च्या सदस्य संघटनांची फक्त काहीच नावं आहेत.

डॉ. दाभोलकरांचा शहीददिन राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस म्हणून निवडणं हे अगदीच आपसूक आणि समर्पक होतं. निसर्गविज्ञान शिकताना जरी आपण विज्ञानाची पद्धत शिकत असलो, तरीही वैज्ञानिक दृष्टिकोन हा केवळ निसर्गविज्ञानापुरता मर्यादित नाही. वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारणं म्हणजे आपलं आयुष्य अधिक चांगलं जगण्यासाठी आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात विज्ञानाची पद्धत लागू करणं. मानवी आणि सामाजिक प्रश्नांकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणं महत्त्वाचं. सामान्य जनतेबरोबर व्यापक स्तरावर काम करणं त्यासाठी आवश्यक आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचं सार्वत्रिकीकरण करण्यासाठी कशा प्रकारे काम करायला हवं याचं जिवंत आणि ज्वलंत उदाहरण म्हणजे डॉ. नरेंद्र दाभोलकर. 'जेवढा पुरावा, तेवढा विश्वास', ही वैज्ञानिक दृष्टिकोनाची त्यांनी केलेली चार शब्दांची व्याख्या. इतकी संक्षिप्त, नेमकी आणि प्रभावी व्याख्या दुसरी नसेल.

डॉ. दाभोलकरांची वैज्ञानिक दृष्टिकोनावरची दोन व्याख्यानं AIPSN ने इंग्रजीत भाषांतरित केली. २०१८ मध्ये पत्रकं किंवा पुस्तिका रुपात ही व्याख्यानं मल्याळम, तामिळ, तेलुगु, हिंदी, बंगाली, असामी अशा अनेक भाषांमध्ये वितरित केली गेली. डॉ. दाभोलकरांचे इंग्रजी, हिंदी आणि इतर भाषांमध्ये डब केलेले विडिओ पण वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या मोहीमेसाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जातात.

भारताच्या बहुतांश राज्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस साजरा होणं हे एक महत्त्वाचं पाऊल आहे. पण सार्वत्रिकीकरणाच्या कार्याच्या मानाने ते एक लहानसं पाऊल आहे.

'विचारा, का?' या घोषवाक्याचा वापर करून या मोहीमेद्वारे वास्तवाबाबतचे प्रश्न विचारायला नागरिकांना प्रोत्साहित केलं जातं. विद्यार्थ्यांमधील उपजत जिज्ञासेला खतपाणी घातलं जातं. वैज्ञानिक दृष्टिकोन हा विज्ञानाच्या पद्धतीवर आधारलेला आहे आणि प्रश्न विचारणं हा त्याचा गाभा आहे. आजच्या विषारी राजकीय वातावरणात शासनाच्या धोरणांबाबत प्रश्न विचारणं नाउमेद करणारं आहे, प्रश्न विचारणाऱ्याला देशद्रोही म्हटलं जात आहे. या विपर्यासाला AIPSN

कृतीशील ठाम उत्तर देत आहे. आपण देशभक्त असणं म्हणजे काय? तर नागरिकांसाठी आपल्या घटनेने घालून दिलेली कर्तव्यं पार पाडणं. कलम ५१अ नुसार नागरिक म्हणून आपलं कर्तव्य पार पाडायचं असेल तर प्रश्न विचारले पाहिजेत. हीच खरी देशभक्ती आहे. आपल्या देशातली लोकशाही वाचवण्यात आणि ती बळकट करण्यात वैज्ञानिक दृष्टिकोनाचं सार्वत्रिकीकरण महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोन रूजवणं हा चांगल्या विज्ञान शिक्षणाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे गुणवत्तापूर्ण विज्ञान शिक्षणात यशस्वी होणं ही वैज्ञानिक दृष्टिकोनाची पायाभरणी ठरेल. परंतु शिक्षण हक्क कायद्याला दहा वर्षे होऊन गेली तरीही देशात कोठेही शिक्षणातल्या गुणवत्तापूर्ण निष्पत्तीकडे लक्ष दिलं गेलेलं नाही.

आजच्या काळात शिक्षण हक्क कायद्याची आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ ची गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जबाबदारी पार पाडणं आणि पुढे नेणं हे वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या सार्वत्रिकीकरणासाठी आवश्यक आहे. भारताच्या राज्यघटनेतील मूल्यांशी बांधिलकी मानणाऱ्या शाळा आणि त्यांच्या व्यवस्थापनांच्या सहकार्याशिवाय हे घडवणं अवघड आहे. या शाळांचं सहकार्य असेल तर वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या बाबतीत मोठी प्रगती साधता येईल. स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षात आपण राष्ट्रीय कर्तव्य आणि जबाबदारी म्हणून हे काम पुढे नेऊया.

---

चौकट

१९८७ च्या भारत जनविज्ञान जथ्यानंतर भारतभरातील विज्ञान कार्यकर्ते एकमेकांच्या जास्त संपर्कात राहून काम करू लागले आणि ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्कचा जन्म झाला. साक्षरता मोहीमेत एआयपीएसएन चे जाळे वाढत गेले. सूर्यग्रहणे, शुक्राचं अधिक्रमण, कॉमेट आयसॉन, शून्य सावलीचा दिवस यासारख्या खगोलीय घटनांच्या वेळी भारतभर आपण कार्यक्रम करतो. शिक्षण, आरोग्य, आत्मनिर्भर विकास, उपजीविका, समता, शेती, पर्यावरण व सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये AIPSN काम करते.

सविस्तर माहितीसाठी वेबसाईट व सोशल मीडिया हँडल्स पुढीलप्रमाणे :

Websites : www.aipsn.net, www.aipsn.in

Twitter- @gsaipsn

Facebook- https://www.facebook.com/theAIPSN

YouTube- AIPSN Media, @aipsnmedia841

Instagram- https://www.instagram.com/aipsnmedia/